सा्प्रवि/ रवका/ गणवेश/ न.क्र.१०/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
प्लॉट नं.१, तळमजला, धारावी,
माटुंगा,मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र.१५ दिनांक ९.१.२००६

विषय : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित अंतर्गत संचालन व सुव्यवस्था मंडलामध्ये तारमार्गावर काम करणा-या कर्मचा-यांना (Line Staff) 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' पुरविणेबाबत.

संदर्भ : संहिताबध्द सर्व साधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२.

......

संहिताबध्द सर्वसाधारण आदेश क्र.१ दि.३१.१०.१९७२ अनुसार पूर्वीच्या म.रा.वि. मंडळातील संचालन व सुव्यवस्था मंडलांमध्ये तारमार्गावर काम करणा-या कर्मचा-यांना (Line Staff) 'रेनकोट' पुरविला जात होता. संबंधित कर्मचा-यांना पावसाळयामध्ये काम करतांना वापरण्यात सुलभता तसेच सुरक्षितता असावी या दृष्टीने म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचनेनंतरच्या म.रा.वी.वितरण कंपनीतील संचालन व सुव्यवस्था मंडलांमध्ये तारमार्गावर काम करणा-या कर्मचा-यांसाठी 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' द्यावा असे वितरण कंपनीच्या काही कार्यालयांकडून प्रस्तावित करण्यात आले होते.

२. या संदर्भात सर्वकष विचार करुन मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) आणि कंपनी संचालक (वित्त) यांच्या सहमतीने व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.९.२००५ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार म.रा.वी.वितरण कंपनीतील संचालन व सुव्यवस्था मंडलांमध्ये तारमार्गावर काम करणा-या कर्मचा-यांना (Line Staff) 'रेनकोट' ऐवजी 'रेनसूट' पुरविण्यासाठी मंजुरी दिली आहे.

३. सदर रेनसूटची किंमत कमाल रु.५५०/- (रुपये पाचशे पन्नास पर्यंत फक्त) पर्यंतच असावी.

४. 'रेनसूट' २ वर्षाच्या प्रत्येक गटवर्षाकरिता द्यावयाचा असून चालू गटवर्ष २००५-२००७ असे धरले जावे.

(सही)

( शु. य. पाटील )
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रत :
म.रा.वीज वितरण कंपनी मर्यादितच्या प्रेषण यादीनुसार.

D/Uniform-1